॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## परीक्षा विज्ञान व शिक्षणशास्त्र विभाग

जा.क्र.कबचौउमवि/७-क/विज्ञान/ १२१५ /२०२६ दिनांक:- १३/०३/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य, / प्राचार्या,
कबचौउमविशी संलग्न सर्व विज्ञान महाविद्यालये यांना,

**विषय** :- माहे **उन्हाळी** २०२६ मध्ये होणा-या बी.एस्सी या वर्गाच्या परीक्षेकरीता अतिरीक्त संधी बाबत

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपण आपल्या महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांचे माहे **उन्हाळी** २०२६ मध्ये होणाऱ्या बी.एस्सी. अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रविष्ट होणेसाठी अतिरीक्त संधी मिळणेकरीता विनंती अर्ज विद्यापीठास सादर केले आहेत.

त्या अनुषंगाने, प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, खालील तक्ता - **' अ '** मध्ये नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना अध्यादेश ६७ मधील तरतुदीनुसार मा.कुलगुरू महोदयांनी माहे **उन्हाळी** २०२६ च्या परीक्षेसाठी अतिरिक्त संधी उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना संधी मंजूर केलेली नाही त्यांची नावे तक्ता - **' ब '** मध्ये नमूद केलेली आहेत. सदर बाब संधी प्राप्त विद्यार्थ्यांच्या निर्देशनास त्वरीत आणून देवून, त्यांचे परीक्षा **अर्ज नियमीत परीक्षा शुल्क + अतिरीक्त परीक्षा शुल्क एक व दोन विषयांसाठी रु. १३००/- आणि दोन पेक्षा जास्त विषयांसाठी प्रती विषय रू. ६५०/- या प्रमाणे परीक्षा शुल्क स्विपकारून महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयात . दि.२०/०३/२०२६ पर्यंत जमा करावेत.** सदर परीक्षा अर्जासोबत त्या अभ्यासक्रमाच्या सर्व वर्गाच्या आजतागायत मिळालेल्या गुणपत्रकांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे**. दि.२०/०३/२०२६** नंतरचे प्राप्त होणारे संधीचे परीक्षा अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत व यासंदर्भात पत्रव्यवहार ही केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच, जुन्या अभ्यासक्रमाच्या सर्व संधी संपल्या असल्याकारणाने सदर अनुत्तीर्ण विषयांसाठी, नविन अभ्यासक्रमातील समकक्ष विषयांची परीक्षा देणे विद्यार्थ्यांना बंधनकारक व क्रमप्राप्त आहे. **जे विद्यार्थी जून्या अभ्यासक्रमातील Annual Pattern चे आहेत त्यांनी नवीन अभ्यासक्रमातील सेमिस्टर पॅटर्नच्या दोन्ही सत्रांच्या संबंधित/समकक्ष दोन्ही विषयांची परीक्षा देणे अनिवार्य राहील.** तसेच सदर विद्यार्थ्यांना ज्या विषयांसाठी परीक्षा देणेकरीता अतिरीक्त संधी मान्य केलेली आहे त्या विषयाचा समकक्ष विषय माहे **उन्हाळी** २०२६ च्या परीक्षेतील वेळापत्रकात नमूद असणे आवश्यक आहे. सदर बाबीची विद्यार्थ्यांने व महाविद्यालयाने आपल्या स्तरावर खात्री करूनच संधीचे परीक्षा अर्ज भरावेत व दिनांक **दि.२०/०३/२०२६** पावेतो विद्यापीठास सादर करावेत ही नम्र विनंती.

**सोबत :- संधी मान्य केलेल्या विद्यार्थ्यांची यादी - तक्ता " अ "**
**संधी नाकारलेल्या विद्यार्थ्यांची यादी - तक्ता " ब "**

**आपला विश्वासू,**

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## परीक्षा विज्ञान व शिक्षणशास्त्र विभाग

**Application for Marcy Chance of B.Sc.For Examination Winter, 2025**

**तक्ता " A "**

**संधी मान्य केलेल्या विद्यार्थ्यांची यादी**

| Sr. No. | Student Name | College Code | PRN.NO. |
|---|---|---|---|
| 1 | Patil Varsha Anil | 180037 | 2016015400167482 |
| 2 | Bhalerao Bhavana Himmatrao | 160031 | 2014015400162865 |
| 3 | Wagh Nikita Rajendra | 210026 | 2015015400256801 |
| 4 | Patil Vaishnavi Ravindra | 170033 | 2016015400030323 |
| 5 | Madan Sonali Dadaji | 210027 | 2012015400259997 |
| 6 | Shelke Rahul Suresh | 200058 | 2012015400050385 |
| 7 | Sonawane Ashwin Mahesh | 100002 | 2016015400426047 |
| 8 | Mahajan Maya Vikram | 190042 | 2013015400027027 |
| 9 | Mali Sonali Sanjay | 130021 | 2014015400277606 |
| 10 | Babale Kiran Pratapsingh | 110016 | 2016015400234516 |
| 11 | Shinde Rina Eknath (Handicap) | 200073 | 2010015400494502 |

**तक्ता " B "**

**संधी नाकारलेल्या विद्यार्थ्यांची यादी**

| Sr. No. | Student Name | College Code | PRN.NO. |
|---|---|---|---|
| 1 | Kureshi Rahil Vakar | 200110 | 2016015400383475 |
| 2 | Vasave SanjayVanya | 260049 | 2017015400083515 |
| 3 | Kumavat Bhushan Ravindra | 240036 | 2017015400343235 |
| 4 | Kulkarni Dipali Hemkant | 190042 | 2015015400151586 |

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)